**<u>ठळक बातम्या</u>**

- ब्रिक्स देशांकडून पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध, जाहीरनाम्यात ग्लोबल साऊथ देशांसाठीच्या महत्त्वाच्या मुद्द्यांना स्पर्श

- आगामी जनगणनेची प्रक्रीया पुढच्या वर्षीच्या एप्रिलपासून सुरू होणार

- राज्यात लवकरच मेगा भर्ती प्रक्रिया सुरू करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची घोषणा

**आणि**

- इराणमधे गुहेत शोधकार्य करताना मिथेन वायूच्या संपर्कात आल्यामुळे १२ तुर्की सैनिकांचा मृत्यू

**<><><><>**

ब्रिक्स राष्ट्रांनी सर्व प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी वचनबद्धता दर्शवली. तसंच पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला. परराष्ट्र मंत्रालयातल्या आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव दम्मू रवी यांनी ब्रिक्स परिषदेच्या पहिल्या दिवसानंतर रिओ मधे वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. ब्रिक्स देशांच्या नेत्यांनी रिओ द जानिरो मधे झालेल्या परिषदेनंतर प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यात ग्लोबल साऊथ म्हणजेच विकसनशील देशांच्या दृष्टीने महत्त्वाच्या सर्व मुद्द्यांना स्पर्श केला आहे. या जाहीरनाम्यामुळे भारताच्या शेजारी देशांना कठोर संदेश गेला आहे असं ते म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इतर महत्त्वाच्या विषयांबरोबरच ब्रिक्स देशांनी मिळून विज्ञान आणि संशोधन विषयक रिपॉझिटरी भांडाराची स्थापना करावी असं सुचवलं. महत्त्वाची खनिजं, पुरवठा साखळी, कृत्रिम बुद्धिमत्ता इत्यादी क्षेत्रांवर त्याचा भर राहील. जागतिक पातळीवर काम करणाऱ्या अनेक संस्थांमधे तातडीनं सुधारणा करण्याची गरज मोदी यांनी परिषदेत मांडली.

**- - होल्ड - प्रधानमंत्री बाइट - -**

प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत उद्या ४ महत्त्वाचे सामंजस्य करार ब्राझिल बरोबर होणार असल्याचं भारताचे राजदूत दिनेश भाटिया यांनी सांगितलं. दहशतवादाशी मुकाबला

करण्यासाठी माहितीची देवाण घेवाण, नवीकरणीय ऊर्जा, कृषी संशोधन या क्षेत्रात हे करार होणार आहेत.

**<><><><>**

संसद, सरकार आणि न्यायव्यवस्था या लोकशाहीच्या तीन स्तंभांमधे समतोल असला पाहिजे असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. उपराष्ट्रपती दोन दिवसांच्या केरळ दौऱ्यावर असून ते आज कोच्चीच्या प्रगत विधी अभ्यास राष्ट्रीय विद्यापीठात विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते. शांतता आणि सौहार्दावर आधारलेल्या जगाच्या निर्मितीत  भारताची भूमिका महत्त्वाची  असल्याचं ते म्हणाले.

**<><><><>**

आगामी जनगणनेची प्रक्रिया पुढच्या वर्षीच्या एप्रिलपासून सुरू होणार असल्याचं नोंदणी महासंचालक आणि जनगणना आयुक्त कार्यालयानं आज समाज माध्यमांवर जाहीर केलं. सुरुवातीला घरांची नोंदणी आणि मोजणी होईल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची गणना होईल, त्यात जातनिहाय जनगणनेचा समावेश असेल असं त्यांनी कळवलं आहे. यासाठी १ जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२७ दरम्यान प्रशासकीय सीमारेषांमध्ये कुठलेही बदल करू नये असं आवाहन जनगणना आयुक्तांनी सर्व राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांना केलं आहे.

**<><><><>**

राज्यात लवकरच मेगा भर्ती प्रक्रिया सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत केली. यासंदर्भातल्या एका लक्षवेधी सूचनेवर ते उत्तर देत होते. राज्य सरकारनं सत्तर हजार जागांची भर्ती जाहीर केली होती मात्र प्रत्यक्षात ती एक लाखाच्या वर पोहोचली आहे. आता १५० दिवसांच्या कार्यक्रमात सर्व विभागांना आकृतीबंध सुधारून, भर्तीसेवा नियम नव्यानं तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत, ते होताच मेगा भरती प्रक्रिया सुरू केली जाईल, असं त्यांनी सांगितलं.

- **- होल्ड - मुख्यमंत्री बाइट - -**

एकशे पन्नास दिवसांच्या कार्यक्रमात अनुकंपा तत्वावर प्रलंबित असलेली भरती पूर्ण केली जाणार आहे.  सर्व जात वैधता तपासणी समित्या स्थापन केल्या आहेत, ही वैधता

तपासणी करण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एक समिती स्थापन केली आहे, त्यामुळे ही कारवाई अधिक पारदर्शी आणि गतिमान होईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

भर्ती प्रक्रियेत बनावट प्रमाणपत्रांना मान्यता देणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असं उद्योग मंत्री उदय सामंत यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितलं.

**<><><>**

राज्यात रेशनसाठी पुरवण्यात येणाऱ्या तांदळाच्या खरेदीत आणि वितरणात भ्रष्टाचार होत असल्याच्या आरोपाची चौकशी करून अधिवेशन संपण्यापूर्वी तो अहवाल सादर करावा, असे आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज दिले. काँग्रेसच्या नाना पटोले यांनी काही दिवसांपूर्वी हा आरोप केला होता. त्यावरच्या प्रश्नादरम्यान अध्यक्षांनी हे आदेश दिले.

राज्यातल्या शासकीय रुग्णालयांमधे औषध खरेदीसाठी स्थानिक प्रशासनाला एकूण अर्थसंकल्प तरतुदीच्या ३० टक्क्यापर्यंत औषध खरेदीचे अधिकार दिले असल्याचं वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितलं. ही खरेदी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालच्या स्वतंत्र प्राधिकरणामार्फत केली जाते. मात्र, औषध खरेदीला विलंब होत असेल तर औषधं तातडीनं उपलब्ध व्हावीत यासाठी स्थानिक प्रशासनाला हे अधिकार दिले आहेत.

**<><><>**

कोणत्याही खासदारांना मराठी माणसाच्या कर्तबगारीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा अधिकार नाही, असं निवेदन राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत दिलं. भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी मराठी माणसांच्या संदर्भात केलेल्या वक्तव्यावर ते बोलत होते. कायद्याच्या चौकटीत राहून आपलं मत मांडण्याचा अधिकार सर्वांना आहे, मात्र मराठी माणूस कुणी फेकलेल्या तुकड्यांवर जगत नाही. देशाच्या जीडीपीतलं मराठी माणसाचं योगदान काय आहे, याची माहिती त्या खासदारांनी घ्यावी, असा सल्ला त्यांनी नाव न घेता दुबे यांना दिला.

**<><><>**

स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या टीकेप्रकरणी त्यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला हक्कभंग प्रस्ताव आज विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी मंजूर केला. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात भाजपचे विधान परिषदेतले गटनेते प्रवीण दरेकर यांनी विधान परिषदेत कुणाल कामरा यांच्या विरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल केला होता. सभापती राम शिंदे यांनी या प्रस्तावाला आज मंजुरी दिली असून हा प्रस्ताव आता विधान परिषदेच्या हक्कभंग समितीकडे पुढच्या चौकशीसाठी पाठवण्यात आला आहे.

**<><><>**

महाराष्ट्रानं दूध उत्पादनात सहकाराच्या माध्यमातून अमूल, मदर डेअरी प्रमाणे दुधाचा सामायिक ब्रँड निर्माण करावा, अशी सूचना राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केली. आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष तसंच सहकार मंत्रालय स्थापना दिनानिमित्त आज राजभवनात झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. सहकार यशस्वी झाला तरच विकास सर्वसमावेशक होईल, असंही ते म्हणाले

**<><><>**

ऑपरेशन सिंदूर दरम्यान शौर्य आणि स्वदेशात निर्मित उपकरणांच्या क्षमतांचं प्रदर्शन यामुळे आपल्या स्वदेशी उत्पादनांची मागणी जागतिक स्तरावर वाढली असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत आयोजित संरक्षण लेखा विभागाच्या नियंत्रकांच्या परिषदेत बोलत होते. जग भारताच्या संरक्षण क्षेत्राकडे नव्या आदराने पाहत असल्याचं ते म्हणाले.

**<><><>**

छत्तीसगडमधे आज सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एक माओवादी मारला गेला. त्याच्यावर ८ लाख रुपयांचं बक्षीस होतं. बस्तर विभागात बिजापूर जिल्ह्यातल्या नॅशनल पार्क भागात ही चकमक झाली.

**<><><>**

नागालँडमध्ये दिमापूरच्या कुडा गावात दोघांचा वीज पडून मृत्यू झाला, तर पोलिस कॉलनीतील एका महिलेचा पाणी साचल्यामुळे विजेचा धक्का लागून मृत्यू झाला. गेले काही दिवस नागालँडमध्ये संततधार सुरू आहे.

**<><><><>**

विम्बल्डनमध्ये पुरुष दुहेरीत भारताचा युकी भांब्री आणि त्याचा जोडीदार रॉबर्ट गॅलोवे यांना प्रतिस्पर्धी जोडीकडून अटीतटीच्या सामन्यात ४-६, ६-३, ६-७ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष एकेरीत नोवाक जोकोविच याचा सामना ॲलेक्स डिमिनॉर याच्याविरुद्ध सुरू आहे. तर दुसऱ्या सामन्यात अग्रमानांकित यानिक सिनर याच्यासमोर आज ग्रेगॉर दिमित्रोव याचं आव्हान असेल.

**<><><><>**

इराणमधे एका गुहेत शोधकार्य करताना मिथेन वायूच्या संपर्कात आल्यामुळे बारा तुर्की सैनिकांचा मृत्यू झाला आहे. तुर्कियेच्या संरक्षण मंत्रालयाने ही माहिती दिली आहे. २०२२मध्ये इराकमध्ये कुर्दिस्तान वर्कर्स पार्टीच्या दहशतवाद्यांविरुद्ध कारवाई करताना गोळीबार झाला होता. या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या सैनिकांच्या मृतदेहाचा शोध घेण्यासाठी काल तुर्किये सैन्याचे १९ जवान गुहेत गेले होते. त्यांना मिथेनच्या संपर्कात आल्यामुळे त्रास सुरू झाला. त्यांना तातडीनं रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं.

**//<><><><>//**